Shriniwas Hemade M.A. Ph.D.
Associate Professor& Head, Department Of Philosophy, Co-Coordinator: Department of Journalism,
S.N. Arts, D.J.M. Commerce & Science College, Sangamner 422 605, Dist. Ahmednagar
Email – shriniwas.sh@gmail.com, cell: 9226563052, Website: http://shriniwashemade.yolasite.com/
प्रकाशन : "पुरुष स्पंदनं – माणूसपणाच्या वाटेवरची" मैत्री विशेषांक , २००९ दिवाळी अंक, संपादक : हरीश सदानी, मुंबई



# मैत्रीची बाजारपेठ : मैत्री विकतच घ्यावयाची असते !

श्रीनिवास हेमाडे

मैत्रीला आयुष्यात खूप महत्वाचे स्थान असून ते पूर्णपणे ऐच्छिक,चिरेबंदी आणि चिरस्थायी सामाजिक नाते आहे. समाजशास्त्रीय अर्थाने ती सामाजिक संस्था आहे तर मानसशीयदृष्ट्या भावनिक अन्न आहे. सामाजिक असणे म्हणजे संस्कृती निरपेक्ष असणे. समाजाची रचना व मैत्रीची रचना यांच्यात एकास एक संबंध आहे की नाही , असा प्रश्न उपस्थित करता येतो.

मैत्री ही सापेक्ष संज्ञा आहे.' मित्र व मैत्री ' या संज्ञांमधून व्यक्तिची वैशिष्ट्ये नव्हे तर दोन किंवा अधिक व्यक्तिंमधील नाते स्पष्ट होत असते.

आत्मीयता,सार्वभौमता,परस्पर सहानुभाव,मित्रनिवडीतील उत्कटता आणि कोणत्याही अंतस्थ हेतूचा पूर्णपणे अभाव असलेली मैत्री ही व्यावहारिक वस्तू आहे. मानवी जीवनाचा जणूकाही ती गाभा असते. पण प्रत्यक्ष व्यवहारात मैत्री हे मूल्य फारसे जपले जात नाही.

मैत्री ही ज्ञान, तर्क, प्रेम, सौंदर्य, ईश्वर, धर्म, संगीत यासारखी एक संकल्पना आहे. तिचे स्वरुपच असे आहे की ती आपल्या सामाजिकीकरणात अतिशय मोलाची भूमिका बजावते.आपला श्वासोच्छवास जितका सहज व्हावा तितकीच ही संकल्पना आपल्या व्यक्तीत्वात व जीवन व्यवहारात मुरलेली आहे.

आपण राजकारण,महागाई,बेकारी,हवामान,पाककृती,घड्याळ दुरुस्ती,काजेबटन,झाडू यांचा किंवा रोमॅण्टीक प्रेमाचा सुध्दा जेवढा विचार करतो तितकाही मैत्रीचा विचार करत नाही जीवनाच्या महत्त्वाच्या एका अंगाकडे आपण इतके कमी लक्ष देतो, ही शोकांतिका आहे.

गेल्या काही वर्षात या शोकांतिकेच्या तणावात जागतिकीकरणामुळे भर पडली आहे.खुले आर्थिक धोरण समाजात काही प्रमाणात काही स्तरांवर समृध्दी आणण्यात यशस्वी ठरले तरी नातेसंबंधात खंकपणाही आला. जागतिकीकरणाच्या विकराल लाटेच्या विळख्यात 'मैत्री' ही संकल्पना सुध्दा सापडून ती उपयुक्ततावादी,बाजारू,दिखावू बनावटीची झाली अथवा ते पोकळ,कसलीही जबाबदारी न घेणारे नाते , नव्या नात्याची निर्मितीक्षमताही नसलेले क्लिब नाते बनले.

' फ्रेंडशिप डे, व्हॅलेंटाईन डे' साजरे होण्यामागे मैत्रीचे सेतू किती बांधले जातात आणि धंदा किती जोखला जातो;हा गंभीर संशोधनाचा विषय आहे.शिवसेना इत्यादी भारतीय संस्कृतीच्या स्वयंघोषित रक्षकांचा विरोध ही चिंताजनक गोष्ट त्यामुळेच ठरते.

भारतीय समाजात तर, मैत्री ही संकल्पनाच फारशी मान्य नाही. स्त्री-पुरुषंचा संबंध केवळ वर्ण,जाती आणि रक्ताचाच संबंध असतो असे समजले जाते.किंवा मग तिला थेट गूढतावादी , आध्यात्मिक रुप दिले जावून ती इतकी भव्य बनविली जाते की मानवी आकलनाच्या,व्यवहाराच्या पलिकडेच जाते.जशी दुर्योधनकर्णाची, कृष्णअर्जुनाची, कृष्णसुदाम्याची मैत्री.रामाला जीवलग भाऊ होते,भक्त होते,आहेत; पण एकही मित्र नव्हता.सीता ही तर थेट आज्ञाधारक पत्नी होती.सखा हा पर्यायी शब्दही आकलनाबाहेरच राहिला. किंवा मग भारतीय कथासागरामधील शेकडो मित्रकथा सुध्दा मैत्री संकल्पनेची केवळ व्यावहारिक बाजूच पुढे आणतात.

**मित्र म्हणजे नेमका कोण ?**

' मित्र' मिळविण्यासाठी , -

1) मला ''*काय* ''करावे लागेल ? म्हणजे 'आपण'' इतरांचे मित्र व्हावे, यासाठी मला, काय काय करावे लागेल ?

2) त्याचवेळी ज्याना माझे मित्र व्हावे, असे वाटते, त्या मित्रांनी *काय काय* केले पाहिजे ?

हे गंभीर प्रश्न आहेत.

याचाच अर्थ 'मित्र असणे म्हणजे नेमके काय व कसे असणे ?'

Shriniwas Hemade M.A. Ph.D.
Associate Professor& Head, Department Of Philosophy, Co-Coordinator: Department of Journalism,
S.N. Arts, D.J.M. Commerce & Science College, Sangamner 422 605, Dist. Ahmednagar
Email – shriniwas.sh@gmail.com, cell: 9226563052, Website: http://shriniwashemade.yolasite.com/
प्रकाशन : "पुरुष स्पंदनं – माणूसपणाच्या वाटेवरची" मैत्री विशेषांक , २००९ दिवाळी अंक, संपादक : हरीश सदानी, मुंबई



एखादया बद्दलच्या आपल्या मैत्र भावनेचे वर्णन " आपणांस त्याच्या भल्यासाठी आणि त्याच्यासाठी जे इष्ट आहेत ते त्याला प्राप्त व्हावे" अशी सदिच्छा बाळगणे, असे करावे लागेल. त्यासाठी तुमच्याकडून यथाशक्ती प्रयत्न होतील अशी तुमची वृत्ती असणे व त्या यथार्थतेने प्रकट करणे, म्हणजे मित्र असणे. ही सदिच्छा व्यक्त करण्याची भावना अनुभवणे असते.आणि केवळ आपण त्या अनुभवणे नव्हे तर दुसऱ्या व्यक्तीमध्ये सुध्दा तुम्ही त्या भावना जागविणे.

ही किमान अपेक्षा मान्य झाली की, पुढचे काम सोपे होते. 'तुमचा' मित्र ही अशी व्यक्ती असते की तुमच्या इष्ट गोष्टी प्राप्तीच्या तुमच्या आनंदात आणि दु:खातही सहभागी असते.तुमच्यासंबंधीच्या सुखदु:खाच्या सहभागित्वाची त्या व्यक्तिची भावना हीच ती तुमचा मित्र असण्याची खूण असते.

आता आपण मैत्री करतो ती अखंड राहावी अशी आपली इच्छा असते.तसे होत मात्र नाही.अडथळे येतात.का येतात हे अडथळे ? कारण आपण मैत्रीचे वास्तव स्वरुप लक्षात घेत नाही म्हणून ! हे स्वरुप मूलतः नैतिक असले तरी ते अर्थशास्त्रीय व बाजारपेठीय परिभाषेत मांडता येईल.कदाचित त्यामुळे मैत्री अधिक सुस्पष्ट होईल.

म्हणजे काय ? तर असे की आपण ज्या व्यावहारिक जगात जगतो हे जग विशिष्ट प्रकारच्या समाजव्यवस्थेने, राजकीयव्यवस्थेने ,अर्थव्यवस्थेने आणि विचारव्यवस्थेत पांगलेले आहे. या अनेक प्रकारच्या व्यवस्थांनी मिळून या जगाची म्हणजेच आपल्या जीवनाची रचना झाली आहे.मैत्री ही या व्यवस्थांमधील महत्वाचा व्यवहार आहे.

आणि हा शुध्द देवघेवीचा व्यवहार आहे.

तथापि मैत्रीच्या या व्यावहारिक अंगाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे मैत्रीच्या नात्यात कितीतरी प्रश्न निर्माण होतात. ज्यावेळेस दोन्ही बाजूचे मित्र या अर्थव्यवहाराचे स्वरुप समजावून घेतील तेव्हाच त्यांच्या मैत्रीची इमारतीचा एक पाया मजबूत व भक्कम होईल.

सर्व प्रकारचे तत्त्वकारण झाले, मैत्रीचे उदात्त तत्त्वज्ञान उगाळून झाले की शेवटी आपण " मित्र ही व्यक्तीसुध्दा आपल्या गरजा भागविणारी व्यक्ती आहे " या निर्णयाकडे येतो आणि साहजिकच तुम्ही सुध्दा त्याच्या गरजा भागविणारे असाल तरच तुम्ही त्याचे मित्र बनता.हा दृष्टीकोन हरवला तर दोघांच्या मैत्रीत अडथळा येतो. दोन्ही बाजूंनी हे समीकरण लक्षात घेतले आणि तशी वागणूक ठेवली तर ' मूल्यांसाठी मूल्य ' हा नवा नातेसंबंध अस्तित्वात येतो. हे असे नाते असते की, जे खऱ्या सचोटीचे व टिकाऊ असत

**मैत्रीचे दोन मूलघटक :**

मैत्रीचे हे दोन घटक म्हणजे एका अर्थाने मैत्रीच्या या पायाभूत अटी आहेत. कोणतीही मैत्री या दोन अटींवरच निर्माण होते व यशस्वी होते.

1) कौतुक किंवा आदराचा घटक
2) बौध्दिक स्वरुपाचा स्वार्थ

जर एखादया व्यक्तीने तुमचे कौतुक केले नाही, तुमच्याविषयी आदर दर्शविला नाही, तर तो तुमचा मित्र होऊ शकत नाही. कारण त्याने तसे केले तर आणि तरच तुम्ही त्याच्या गरजा भागविण्याची शक्यता असते. उलट्या बाजुने तुम्ही कोणाचे कौतुक केले नाही किंवा आदर दर्शविला नाही तर ती व्यक्ती तुमची कोणती गरज भागविणार किंवा अशा व्यक्तीचं तुमच्याशी काय देणे घेणे असेल ? याचा अर्थ असा कौतुक करणे किंवा आदर करणे हा कोणत्याही दोन व्यक्तींमधील मैत्रीचा अगदी पहिला पाया आहे.ही भावनिक गरज म्हणा हवी तर.

मैत्री यशस्वी करणारा दुसरा धागा म्हणजे विचारपूर्वक स्विकारलेला स्वार्थ.म्हणजेच सुबुध्द स्वार्थीपणा होय.आपल्या मैत्रीची किंमत जोखून, ओळखून,त्या मैत्रीचे मूल्य ओळखून त्याची किंमत देणे व घेणे हा मैत्रीचा दुसरा पाया आहे.जी माणसे हे ओळखू शकत नाही त्यांना मैत्री करण्यात अडथळे येतात.अशी माणसे " हे जग माझे जगण्यासाठीचे देणे लागतो " (World -Owes-Me-A-Living-Theory) या सिध्दांताने ग्रासलेले असतात. खरे तर कोणीच कोणाचे कसलेही देणे घेणे लागत नाही मैत्रीत तर मूळातच नाही.मैत्री हवी असेल तर मैत्रीला असलेले मूल्य चुकते करावे लागते.' मूल्यासाठी मूल्य ' या आधारावरच (Value for Value Basis) मैत्री होते. हे एकदा लक्षात घेतले की आपणास अतिशय आश्चर्यकारक अनुभव येतील.

Shriniwas Hemade M.A. Ph.D.
Associate Professor& Head, Department Of Philosophy, Co-Coordinator: Department of Journalism,
S.N. Arts, D.J.M. Commerce & Science College, Sangamner 422 605, Dist. Ahmednagar
Email – shriniwas.sh@gmail.com, cell: 9226563052, Website: http://shriniwashemade.yolasite.com/
प्रकाशन : "पुरुष स्पंदनं – माणूसपणाच्या वाटेवरची" मैत्री विशेषांक , २००९ दिवाळी अंक, संपादक : हरीश सदानी, मुंबई



या दोन मुद्दयांच्या आधारे मैत्रीची एक व्यावहारिक परंतु शुध्द आर्थिक मूल्य असणारी संकल्पना आहे,अशी भूमिका मांडणे शक्य आहे.हे आर्थिक मूल्य, मैत्रीचे सामाजिक नाते टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असलेले सामाजिक मूल्यप्रधान नाते आहे, असे म्हणता येईल.

आयुष्यात जमीन, संपत्ती इ. गोष्टी कमवाव्यात तशी मैत्री ही कमावण्याची गोष्ट आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. ती आपोआप मिळणारी गोष्ट नाही. तुम्ही जेव्हा इतरांशी मैत्री करता तेव्हा तुमचा मित्र तुमच्याकडे काय म्हणून कोणत्या अर्थाने पाहात असतो ? तुमच्या मैत्रीचे मूल्यमापन तो कसे करतो ? कोणत्या तराजूत तो मोजतो ?

तर तुमच्या मित्राकडे मैत्रीतून मिळणारा एक विशिष्ट प्रकारचा तराजू असतो. त्याला म्हणावे ‘आनंद मोजण्याचा श्री शिल्लक तराजु ’ (Weight and Balance happiness Scale). त्या तराजूनेच तो तुमची मैत्री तोलत असतो, जोखत असतो.

*आणि तुम्हीही तेच करीत असतात.कारण तुमच्याकडेही तसाच तराजू असतो.*

हे वास्तव लक्षात घेतले तर “ मी मित्रासाठी त्याग केला ” असा दावा तुम्ही करता तेव्हा हे लक्षात घेणे आवश्यक आहे की तुमच्या बाजूने त्यागाचीही कृती म्हणजे एक ‘जाणीवपूर्वक’ सुबुद्धीने केलेली शुध्द स्वार्थाची कृती असते.त्या व्यक्तीची मैत्री तुम्हाला सुखदायी असते म्हणून तुम्ही स्वार्थाने त्याग करता.पण मित्राकडे सुध्दा असाच तराजू आहे,हे मात्र विसरता !

पण या तराजूचे अस्तित्व लक्षात घेतले की तुम्हाला ‘योग्य भूमिका ’ स्विकारणे शक्य होते.अर्थात मैत्रीत स्वार्थ असतो आणि तो विशिष्ट तराजूने मोजला जातो, हे वास्तव स्विकारणे, अनेकांना रुढी आणि परंपरा यांच्या दबावामुळे फारच कठीण होते. खरे तर प्रत्येक नातेसंबंध हा स्वार्थावरच आधारलेला असतो. एकदा हा स्वार्थयुक्त मैत्रीचा नातेसंबंध स्विकारला की आपण व आपले मित्र अतिशय प्रामाणिक व वास्तववादी बनतो.मग तुमची मैत्री हा एक मूल्यासाठी मूल्य देणारा दीर्घकाळ टिकणाऱ्या अतिशय सुंदर नातेसंबंधाचे रुप धारण करतो.

अर्थात याचा अर्थ असे नव्हे की,दोन्ही मित्रांनी बाजूंनी एकच प्रकारचे वर्तन करावे. एखादयाला चांगला सल्ला आणि बौध्दीक प्रेरणा हवी असेल तर दुसऱ्याला केवळ गप्पा टप्पांचा आनंद किंवा सहवास हवा असेल तर ते कसेही असू शकते किंवा अन्य काही .

या पार्श्वभूमीवर एक नाजूक (कदाचित भावुकजनांच्या मते संतापजनक ) प्रश्न उपस्थित करता येईल.

*मैत्री विकत घेता येते का ? ती विकाऊ वस्तू आहे का ?*

तर हो ! मैत्री जरुर विकत घेता येते आणि एवढेच नव्हे तर ती विकतच घेतली पाहिजे.

ती जगातील अनेक वस्तूंप्रमाणे एक वस्तू आहे . आणि तिचे स्वरुप ' ज्ञानात्मक पदार्थ’ अशा रितीचे आहे.ज्ञानाची खरेदी - विक्री होत असेल तर ज्ञानवस्तूचीही खरेदी - विक्री होवू शकते.ज्ञान ही जशी अमूर्त वस्तू असूनही आपण ती विकत घेतो;तशी मैत्री देखील ज्ञानवस्तू असून तिचा खरेदी-विक्री व्यवहार शक्य आहे.

आणि मैत्री विकत घेणे हा मित्र मिळविण्याचा एकमेव मार्ग आहे.

किंबहूना जगातील प्रत्येकजण आपले मित्र विकतच घेत असतो. व सगळे जग म्हणजे *मैत्रीच्या मुक्त बाजारव्यवस्थेचा उद्योग आहे (Free Enterprize Friendship Market).* या बाजारात मैत्रीचा आकार आणि दर्जा यानुसार व्यक्तिगणिक मैत्रीच्या किंमती बदलत असतात.पण प्रत्येक मित्राला किंमत असते. ती मोजावीच लागते. मुक्त बाजाराचे जे नियम असतात तेच मैत्रीच्या बाजारालाही लागू असतात.

उदाहरणार्थ असे 2 नियम आहेत:

1) मुक्त बाजार व्यवस्थेच्या उद्योगातील प्रत्येकाला काही ना काही गरजा असतात.

Shriniwas Hemade M.A. Ph.D.
Associate Professor& Head, Department Of Philosophy, Co-Coordinator: Department of Journalism,
S.N. Arts, D.J.M. Commerce & Science College, Sangamner 422 605, Dist. Ahmednagar
Email – shriniwas.sh@gmail.com, cell: 9226563052, Website: http://shriniwashemade.yolasite.com/
प्रकाशन : "पुरुष स्पंदनं – माणूसपणाच्या वाटेवरची" मैत्री विशेषांक , २००९ दिवाळी अंक, संपादक : हरीश सदानी, मुंबई



2) गरजा भागविणाऱ्या प्रत्येक योग्य मौलिक वस्तूला किंमत असते.

हे मान्य केले की मग मैत्रीच्या संदर्भात मूल्य कशाला असते ? कोणते असते ? कसे असते ? ते कसे मोजावयाचे ? हे व असे इतर प्रश्न उपस्थित करता येतील. हे पहा,तुम्ही रोख पैसे मित्राला दिले पाहिजेत , असे नव्हे . तर तुम्ही मित्राला रोज किती वेळ देता ? त्याला कोणती प्रेरणा देता ? या प्रेरणांचे स्वरुप कोणते नैतिक की आर्थिक , वैचारिक की आत्मिक ? तुमचा मित्र तुमच्याबरोबर कोणकोणते आनंद घेत असतो ? तुमच्याकडून त्याला नेमके काय,कसे,किती मिळते ? त्याला कोणती मदत तुम्ही करता ? की नुसताच पोकळ सहवास देता ?

या सर्व प्रश्नांची उत्तरे देणे सक्तीचेच असते.असे सगळे करणे ही एका अर्थाने तुम्ही तुमच्या मित्रांमध्ये केलेली भांडवली गुंतवणूक आहे.मूल्य या सगळ्यांना आहे.

ही गुंतवणूक करावीच लागते.कारण मैत्रीच्या बाजारव्यवस्थेतील मुक्त उद्योगाच्या तुम्ही व्यवस्थेचे भाग असता.तुम्ही एखादयाची गरज भागविता म्हणजे त्याच्याशी मैत्री जोडण्याची तुम्ही किंमत देत असता आणि जेव्हा आपल्या पोटातील पाणी न हालविताही " हे जग माझ्या जगण्याचे देणे लागते " या सिध्दांताच्या आधारे केवळ काहीतरी मिळविण्याचीच अपेक्षा तुम्ही करता तेंव्हा तुम्ही बाजारपेठेतून बाहेर फेकले जाण्याच्या पात्रतेचे बनता.

तुम्ही मित्र व्हावे म्हणून तुमचा मित्र तुमचे मूल्य चुकते करीत असतो त्यावेळी तुम्ही ही त्याचे मूल्य चुकते केलेच पाहिजे.पण तुम्ही किंमत देण्यास राजी नसाल तेव्हा खरा मैत्रीत उडथळा निर्माण होतो.

अर्थात तो मित्रही असेच अडथळे निर्माण करु शकतो.असे सगळे जण करीत असतात. एक तुकडाही खर्च न करता आपल्याच सगळे मिळावे, असे प्रत्येकाला वाटते. तुम्हालाही वाटत असेल तर वाईट वाटून घेवू नका .पण मग वाईट वाटण्याचे मूल्य म्हणून मित्रापासून तुटण्याचे मूल्य देण्यास राजी व्हा. कदाचित ही तुम्हाला शिक्षा वाटेल ! ती भोगा !!

कारण तुमची ही आयातोबावृत्ती तुम्ही दाबून टाकल्याशिवाय तुम्हाला मित्र मिळणार नसतात. हा स्वार्थ तुम्ही जितका दाबाल, नियंत्रणात आणाल तितके मित्र मिळविण्याची व इतरांचे मित्र बनण्याची तुमच्या आयुष्यातील संधी वाढत जाईल ; अन्यथा नाही.

थोडक्यात, कोणाशीही मैत्री करताना आपण दोन गोष्टी पाळल्या पाहिजे.

एक, या माणसाशी मैत्री करताना मला काय मूल्य दयावे लागेल ?

दुसरे, ते मूल्य देण्यास मी तयार आहे का ? आणि तितकी माझी ताकत आहे का ?

या दोन गोष्टी पूर्ण करणे म्हणजे दीर्घकालीन मैत्री जोडणे.

**मैत्री तोडायचीय ?**

समजा तुम्हाला मैत्री तोडायची आहे तर तुम्ही काय कराल ?

जर ती व्यक्ती तुमची चांगली मित्र असेल तर खूप काही गृहीत धरता येईल आणि तुमच्या सर्वात वाईट शत्रूच्या बाबतीत तुम्ही कल्पनाही करु शकणार नाही, अशा स्वरुपाचे व तितके स्वातंत्र तुम्ही या मैत्री तोडण्याच्या प्रक्रियेत घेऊ शकता.

म्हणजे याचा अर्थ असा की शत्रूशी तुम्ही जितके वाईट वागू शकता, त्यापेक्षाही जास्त वाईट आणि जास्त प्रमाणात तुम्हाला चांगल्या मित्राची मैत्री तोडण्यात वागता येईल पण शत्रूपेक्षाही जास्त वाईट मित्राशी वागण्यात काय अर्थ आहे ? शिवाय तसे खरोखरच वागता येईल का ? कारण -

तुमच्या प्रमाणेच तुमच्या मित्राकडे सुध्दा मैत्रीचे सुख मोजण्याचा 'आनंदाचा श्री शिल्लक तराजू ' असतो, हे विसरु नका.तुम्ही जेवढा खर्च,गुंतवणूक कराल किमान तेवढी गुंतवणूक तुमचा मित्र तुमच्यावर नक्की करणार असतो.ही देवघेव चालूच राहते.ती शांतपणे समजूतदारपणे चालणे हे मित्रत्वाचे यश मानावयास हरकत नाही.

पण तुम्ही मित्रासाठी जो काही खर्च करता त्यापेक्षा त्याच्याकडून येणेच जास्त असेल तर तुम्ही समजूतदारपणे घेतले पाहिजे.तुम्ही घाई करुन वसूली करु पाहाल तर तुम्ही मेलातच ! कदाचित उलटही घडु शकते ना ! ही वसूली तुम्हाला

Shriniwas Hemade M.A. Ph.D.
Associate Professor& Head, Department Of Philosophy, Co-Coordinator: Department of Journalism,
S.N. Arts, D.J.M. Commerce & Science College, Sangamner 422 605, Dist. Ahmednagar
Email – shriniwas.sh@gmail.com, cell: 9226563052, Website: http://shriniwashemade.yolasite.com/
प्रकाशन : "पुरुष स्पंदनं – माणूसपणाच्या वाटेवरची" मैत्री विशेषांक , २००९ दिवाळी अंक, संपादक : हरीश सदानी, मुंबई



परवडत नाही, हे तुमच्या लगेच लक्षात येईल.कारण तुमच्या मित्रालाही हा व्यवहार परवडत नसतो. मित्राने तुमच्यावर खूप खर्च केला आणि तुम्ही खर्च करण्यास तयार नसाल तर त्याने तुमची मैत्री का ठेवावी ? असा साक्षात्कार घडून तो तुमची मैत्री तोडून टाकेल. म्हणून जमाखर्चाचा ताळेबंद समतोल असला पाहिजे. तो नसेल तर तो मैत्रीतला अडथळा असतो, हे आपले मैत्रीचे तत्त्वज्ञान असले पाहिजे.

माझे हे तत्त्वज्ञान तुम्हाला कसे वाटते, ते मी जगजाहीर करावे का ?

हो ! मला तेच तर करायचे आहे. माझी भूमिका मला जगजाहीरच करावयाचे आहे !!

माझ्या मित्राने नेमके हेच समजाऊन घेतले पाहिजे. माझी भूमिका समजावून घेण्यात ते कमी पडले तर माझे मित्र होण्यात त्यांना अडथळा निर्माण होईल.मित्रांसाठी मी योग्य ती किंमत देण्यास तयार आहे.कारण मी ही किंमत दिली नाही तर मी त्यांच्या आयुष्यातून वगळला जाईन ,याचे मला भान आहे आणि .. .. ..

मला अपेक्षित मूल्य देण्यास मित्र तयार नसतील तर मलाच त्यांना वगळावे लागेल.खरे तर किंमत देण्यास तयार नसलेले हे मित्र स्वतःहूनच माझ्या आयुष्यातून वगळले जातील. ते स्वतःच त्यांच्याही नकळत माझ्या आयुष्यातून दूर जातील.

अर्थात हे चांगले घडेल की असल्या स्वार्थी व रोगट मैत्रीपासून माझे संरक्षण होईल.

तेव्हा आपल्या हे लक्षात येते आहे का , की माझ्या मैत्रीचे तत्त्वज्ञान ही अशी 'यंत्रणा' आहे की ती मला नको असलेल्या मित्रांपासून,त्यांच्या त्रासातून किंवा नंतर निर्माण होणाऱ्या विकृतींपासून मला ती वाचवते ! म्हणून मी तिचे स्वागतच केले पाहिजे.!!

-----------------------------------------------------------------------------------